राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/उपस्थिती/२०२०/ 2685 दिनांक : 10 SEP 2020

प्रति,

प्राचार्य / संचालक / उपसचिव,
पुणे विभागातील कार्यालयाचे अधिनस्त
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित संस्था / कार्यालय.

**विषय : महाराष्ट्र राज्यात "MISSION BEGIN AGAIN" या अंतर्गत राज्य शासकीय कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत..**

संदर्भ : महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक समय २०२०/प्र.क्र.३५/ १८(र.वका.) दिनांक ०३/०९/२०२०.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या दिनांक ३१/०८/२०२० च्या आदेशातील नमूद अत्यावश्यक सेवा वगळून इतर शासकीय कार्यालयांमधील उपस्थिती निश्चित करण्यात आलेली आहे. (सोबत प्रत जोडली आहे.)

त्या अनुषंगाने सर्व राज्य शासकीय कार्यालयातील गट अ तसेच गट ब मधील अधिका-यांची उपस्थिती एकूण पदसंख्येच्या १०० टक्के राहील. गट अ तसेच गट ब अधिका-यांव्यतिरीक्त इतर कर्मचारी वर्गाच्या उपस्थिती संदर्भात संदर्भित शासन निर्णयान्वये आदेश दिलेले आहेत.

त्यानुसार सर्व राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी (बाह्य यंत्रणेद्वारे नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांचेसह) यांनी शासकीय कार्यालयामध्ये कोरोना विषाणूंचा प्रसार रोखण्याच्या दृष्टीने सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०४/०५/२०२० व आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग यांच्या दिनांक ३१/०८/२०२० रोजीच्या आदेशातील Annexure I येथे नमूद " कोविड-१९ च्या व्यवस्थापनाबाबत राष्ट्रीय मार्गदर्शक सूचना " (National directives for Covid-19 Management) या मथळ्याखाली नमूद सर्व सूचना तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या आदेशातील सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(डॉ. दि. रा. नंदनवार).
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत : वरील प्रमाणे.

प्रत : ह्या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

महाराष्ट्र राज्यात "Mission begin again" या अंतर्गत राज्य शासकीय कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र.वका.)**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०३ सप्टेंबर, २०२०.

वाचा:-

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ / १८ (र.वका.), दिनांक ४ मे, २०२०,
२. शासन आदेश, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनवर्सन, क्रमांक :डीएमयू २०२०/ सीआर ९२/डीआयएसएम-१, दिनांक ३१ मे, २०२०.
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ / १८ (र.वका.), दिनांक ५ जून, २०२०,
४. शासन आदेश, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनवर्सन, क्रमांक :डीएमयू २०२०/ सीआर ९२/डीआयएसएम-१, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२०.

शासन निर्णय:-

कोरोना विषाणूंचा (COVID-१९) प्रसार राज्य शासकीय कार्यालयांमध्ये होऊ नये, तसेच शासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचा संसर्ग होऊ नये म्हणून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या दृष्टीने या विभागाच्या संदर्भ क्र. १ व ३ येथील शासन निर्णयांन्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. उक्त संदर्भ क्र. १ येथील दि.४ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २ (अ) येथील तरतूदीन्वये, मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र (M.M.R.) तसेच पुणे महानगर पालिका (P.M.C.), मालेगाव महानगर पालिका तसेच पिंपरी-चिंचवड महानगर पालिका (P.C.M.C.) यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय कार्यालयांतील एकूण उपस्थिती ५ टक्क्यांपर्यंत ठेवण्यात आलेली होती. तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या दि.३१ मे, २०२० च्या आदेशातील परिच्छेद क्र.६(iv) येथे नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार, उक्त संदर्भ क्र. ३ येथील दिनांक ५ जून, २०२० रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २ (अ) येथील तरतूदीन्वये, मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र (M.M.R.) या कार्यक्षेत्रातील बृहन्मुंबई महानगरपालिकेसह सर्व महानगरपालिका तसेच पुणे, सोलापूर, औरंगाबाद, मालेगाव, नाशिक, धुळे, जळगाव, अकोला, अमरावती आणि नागपूर या महानगरपालिकांच्या कार्यक्षेत्रातील सर्व राज्य शासकीय कार्यालयामधील उपस्थिती (उक्त दि.३१.५.२०२० च्या आदेशातील परिच्छेद क्र. ६(iv) येथे नमूद केलेल्या अत्यावश्यक सेवा वगळून), पासून १५ टक्के किंवा कमीत कमी १५ कर्मचारी यापैकी जे जास्त असेल इतकी ठेवण्यात आलेली होती.

३. आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या संदर्भ क्रमांक ४ येथील दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० च्या आदेशातील परिच्छेद ४ (iii) मध्ये नमूद केलेल्या अत्यावश्यक सेवा वगळून इतर शासकीय कार्यालयांमधील उपस्थिती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे.

अ) सर्व राज्य शासकीय कार्यालयांतील गट-अ तसेच गट-ब मधील अधिकाऱ्यांची उपस्थिती एकूण पदसंख्येच्या १०० टक्के राहील.

ब) गट-अ तसेच गट-ब अधिकाऱ्यांव्यतिरिक्त इतर कर्मचारीवर्गाची उपस्थिती;

अ) मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र (M.M.R.) या कार्यक्षेत्रातील बृहन्मुंबई महानगरपालिकेसह सर्व महानगरपलिका तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड आणि वेळोवेळी अधिसूचित करण्यात येणाऱ्या इतर महानगरपालिका क्षेत्रांमधील राज्य शासकीय कार्यालयांमधील कर्मचारीवर्गाची उपस्थिती एकूण पदसंख्येच्या ३० टक्के किंवा किमान ३० कर्मचारी यापैकी जे जास्त असेल, तितकी असेल,

ब) महाराष्ट्र राज्यातील इतर भागातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती एकूण पदसंख्येच्या ५० टक्के किंवा किमान ५० कर्मचारी, यापैकी जे जास्त असेल, तितकी असेल,

क) याअनुषंगाने रोटेशन पध्दतीने कार्यालयीन उपस्थिती निश्चित करण्यासाठी प्रत्येक मंत्रालयीन सचिव/संबंधित कार्यालयप्रमुख यांनी आवश्यक ती उपाययोजना करावी.

ड) सर्व राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी (बाह्य यंत्रणेद्वारे नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांचेसह) यांनी शासकीय कार्यालयामध्ये कोरोना विषाणूंचा प्रसार रोखण्याच्या दृष्टीने या विभागाच्या दि. ४ मे, २०२० व आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग यांच्या दि.३१ ऑगस्ट, २०२० रोजीच्या आदेशातील Annexure I येथे नमूद "कोवीड-१९ च्या व्यवस्थापनाबाबत राष्ट्रीय मार्गदर्शक सूचना"(National directives for Covid-१९ Management) या मथळयाखाली नमूद सर्व सूचना तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या आदेशातील सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. उपरोक्त सूचना पुढील आदेशापर्यन्त लागू राहतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२००९०४१३५५१६१२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by SHRIRAM DATTATRAYA YADAV
Date: 2020.09.04 13:57:01 +05'30'

(श्री. द. यादव)
उप सचिव

प्रत :

१. मा.राज्यपाल यांचे सचिव (५ प्रती),